**प्रेसनोट** **दि.०८/०३/२०१९**

## बिबवेवाडी पोलीस ठाणे,पुणे शहर

## दोन वर्षापासुन पाहीजे असलेला आरोपी पोलीसांच्या जाळयात

दि.०८/०३/२०१९ रोजी सकाळी १०:०० वा तपास पथकातील पोलीस शिपाई पुजारी यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, बिबवेवाडी पोलीस ठाणे गु.र.नं.६८/२०१७ भां.द.वि.क. ३९२,५०६(२),४११,३४ मधील पाहिजे आरोपी नामे कालिदास काळभोर हा आईमाता मंदिराजवळ बिबवेवाडी पुणे येथे थांबला आहे. सदर माहिती वरुन बिबवेवाडी तपास पथकातील सपोनि पावसे पो.शि.पुजारी, मोरे शिंदे, लोधा, कुलकर्णी असे खाजगी वाहनाने सदर ठिकाणी जावुन पाहिले असता एक संशयित इसम मिळुन आला त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव कालिदास सुदाम काळभोर वय-३९ वर्षे रा. मु.पो.लोणी काळभोर राम मंदिरा जवळ पुणे असे सांगितले असता त्यास ताब्यात घेवुन अधिक चौकशी केली असता त्यानं दाखल गुन्हयातील चोरी केलेला माल घेतल्याचे कबुल केले असुन सदरचा माल हा मार्केट यार्ड पोलीस ठाणे गु.र.नं.४३/२०१७ भां.द.वि.क.३९२,४११,३४ मध्ये जप्त केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास आज रोजी गुन्हयाचे कामी अटक करण्यात आली आसुन मा.न्यायालयात हजर केले आहे.

सदरची कामगीरी अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर, श्री सुनिल फुलारी पोलीस उप आयुक्त परिमंडळ-०५ पुणे शहर श्री प्रकाश गायकवाड, सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग पुणे शहर श्री मिलींद पाटील यांचे मार्गदर्शना खाली मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे यांचे सुचने प्रमाणे सपोनि पावसे, पो.शि. पुजारी, शिंदे लोधा, मोरे, कुलकर्णी यांनी केली आहे.